पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी–४११ ०१८.
माहिती व तंत्रज्ञान विभाग,
क्र. मातंवि/११/कावि/ 43 /२०२२
दिनांक- २६ /०४/२०२२

विषय- कोटेशन मागविणेच्या कार्यपध्दती बाबत...

संदर्भ- परिपत्रक क्र.दवनि/१/कावि/१३४/२०२२ दि.२१/०४/२०२२

परिपत्रक,

उपरोक्त संदर्भीय परिपत्रकान्वये, मनपाच्या ज्या विभागामार्फत कोटेशन करिता ऑफलाईन पध्दतीने दर मागविणेत येतात. त्या सर्व विभागांनी कोटेशन मागविणे करिता संपुर्ण प्रक्रिया ऑनलाईन पध्दतीने करणेबाबत मा.आयुक्त सो. यांनी आदेश निर्गमित केलेले आहेत. सदर परिपत्रकाची संबंधीत विभागामार्फत अंमलबजावणी होणे आवश्यक आहे.

महानगरपालिके मार्फत निविदा प्रक्रिया राबविणेकरिता सद्यःस्थितीत NIC यांचेकडील महाटेंडर्स ही संगणक प्रणाली वापरणेत येते. सदर प्रणालीमध्ये सिंगल कव्हर व्दारे (ऑनलाईन कोटेशन) मागविणेची सुविधा उपलब्ध आहे. तरी सर्व संबंधीत विभागांनी सदर प्रणालीचा वापर करून कोटेशन ऑनलाईन पध्दतीने मागविणेची कार्यवाही करावी. त्याचप्रमाणे व्यापक प्रसिध्दीसाठी मनपा संकेतस्थळाव्दारे कोटेशन नोटीस प्रसिध्द करणेत यावी. तरी विषयांकीत कार्यपध्दतीबाबत काही तांत्रिक अडचण असल्यास माहिती व तंत्रज्ञान विभागाकडे संपर्क करणेत यावा.

२६/०४/२२

(राजेश पाटील)
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी–४११ ०१८.

प्रति-
सर्व संबंधीत विभाग प्रमुख

Scanned with CamScanner